अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

# राजकीय हलवायांचे नवे तुळशीपत्र

अनेक सरकारी योजनांचा हेतू चांगला असतो. परंतु त्याची अंमलबजावणी धडपणे होईल याची खात्री नसते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घाईघाईने सुरू केलेल्या जनधन योजनेचे भवितव्यदेखील असेच अधांतरी म्हणावे लागेल. पुढच्या सहा महिन्यांमध्ये महाराष्ट्र, हरियाणा आणि नंतर जम्मू काश्मिरमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून ही जनधन योजना घाईघाईने लागू झालेली दिसते. नरेंद्र मोदी मुळातच व्यावसायिक राजकारणी आहेत. १५ ऑगस्टला स्वातंत्र्यदिनाचे मुहूर्त साधून त्यांनी या योजनेची घोषणा केली. खरेतर स्वातंत्र्यदिनाचे भाषण हे प्रामुख्याने सरकारच्या एकूण धोरणात्मक कार्याची दिशा दाखवणारे असते. त्यामध्ये नव्या योजनांची अपेक्षा करणे मुळातच अपेक्षित नाही. या दिवशीचे देशाच्या प्रमुखाचे भाषण हे स्वातंत्र्याची महती आणि ते जपण्यासाठी सरकारकडून केल्या जाणाऱ्या प्रयत्नांची माहिती देणारेच असावे. कारण लाल किल्ल्यावरचे भाषण हे पूर्णपणे देशाची सुरक्षितता, अखंडता आणि सार्वभौमत्व या विषयाशी निगडीत राहणे जास्त संयुक्तिक असते. यादिवशी जर अशा प्रकारच्या घोषणा व्हायला लागल्या तर स्वातंत्र्यदिन आणि लाल किल्ला या दोघांचेही ऐतिहासिक औचित्य टिकू शकणार नाही आणि आतापर्यंत वेगळेपणा असलेल्या राजकीय व्यासपीठाचे स्वरूप येईल. त्यादिवशी मोदींनी जनधनयोजना जाहीर करताना या महिन्याच्या अखेरीपर्यंत ती लागू करण्याचे घोषित केले होते. तातडीने सगळ्या राष्ट्रीयकृत बँकांना योजनेच्या यशस्वीततेसाठी कामाला लावले गेले आणि पहिल्याच दिवशी सव्वा कोटी लोकांची बँक खाती उघडल्याचा गाजावाजा केला गेला आहे. मोबाईलच्या माध्यमातून देशातल्या जास्तीत जास्त लोकांना बँकिंग व्यवहाराशी जोडणे हा त्यामागचा उद्देश असला तरीसुध्दा या खात्यामध्ये त्या व्यक्तीच्या नावामध्ये जमा होणारी जवळ जवळ एकतीस हजाराची रक्कम खरोखरच संबंधित व्यक्तीला कितपत उपयोगी पडेल याबद्दल शंका आहे. कारण यापूर्वीसुध्दा अनेक सरकारी योजनांमधून सबसिडीची रक्कम थेट बँक खात्यात जमा करण्याचा फतवा काढला गेला. काही महिने ही योजना व्यवस्थित चालली. अगदी झिरो बॅलन्सवर बँक खाती सुरू केली गेली. आणि ती सगळी खातीसुध्दा त्या त्या व्यक्तीच्या नावाने झिरो बॅलन्सने रिकामी पडली आहेत. लोकांकडे मुळातच पैसा नाही. सरकारने आकस्मिक कारणांसाठी दिलेले एक लाख रुपये वापरण्याचे स्वातंत्र्य त्या बँक खातेदाराला नाही. अशी जर परिस्थिती असेल तर या जनधनयोजनेचे स्वरुप किती भोंगळ आणि पोकळ आहे, हे लक्षात आल्यावाचून रहात नाही.

## जनधन नको जनमन हवे

हीच योजना अधिक शांतपणे अधिक विचारपूर्वक अधिकाधिक तज्ज्ञांच्या सल्लामसलतीने, एवढेच नव्हे तर सामान्य माणसाच्या अपेक्षांचा आणि आवश्यकतेचा विचार करून लागू केली असती तर ते जास्त योग्य ठरले असते.इतक्या घाईघाईने जेव्हा एखादी सरकारी योजना लागू केली जाते तेव्हा त्याचे गांभिर्य राहात नाही. तो केवळ एक सरकारी उपचार किंवा कर्मकांड ठरतो. बँकांमधले अधिकारी कर्मचारीसुध्दा एक सरकारी आदेश म्हणून त्याची अंमलबजावणी करतात. मात्र ती योजना यशस्वी करण्यासाठी मन लावून काम करण्याची शक्यता उरत नाही. मोदींना आपण पंतप्रधान झालो आहोत हे दाखवून देण्यासाठी काही ना काही करणे आवश्यक होते. पंतप्रधान झाल्यापासून गेल्या तीन महिन्यांत त्यांच्याकडून लोकांना अधिक भक्कम आणि अधिक प्रगल्भ अशा कामाची अपेक्षा होती. अच्छे दिन आनेवाले है। असे सांगत असताना हे 'अच्छे दिन' म्हणजे नेमके काय, हेच लोकांना त्यांच्याकडूनच समजून घ्यायचे आहे. प्रामुख्याने सामान्य माणसाला भेडसावणाऱ्या भ्रष्टाचार आणि महागाई या दोन महत्त्वाच्या समस्यांबाबत मोदी काँग्रेसपेक्षा फार काही वेगळे करू शकतील असे वाटत नाही. ते आल्यापासून संसदेच्या अधिवेशनामध्ये काही विधेयके पारित झाली. काही योजनांची अंमलबजावणी सुरू झाली. निवडणुकीमुळे थांबलेल्या या योजना मागच्या सरकारने आखलेल्या होत्या. त्याचीच कार्यवाही मोदी सरकारने केली. आणि म्हणून काँग्रेसकडून तशी टीकाही झाली. मोदी हे यूपीए सरकारच्याच कार्यक्रमांची अंमलबजावणी करत आहेत, असे वारंवार सांगितले गेले. ही गोष्टदेखील मोदी यांना प्रामुख्याने खटकलेली दिसते. आणि मग तसा ठपका येऊ नये याची काळजी घेत लोकांचे लक्ष आपल्याकडे वेधण्यासाठी त्यांनी या जनधनयोजनेचा आधार घेतला. निवडणुकांच्या आधी त्याची अंमलबजावणी सुरू केली. म्हणूनच या योजनेचा जितका सामाजिक संबंध आहे तितकाच राजकीय अर्थदेखील आहे. जसजशी ही योजना जुनी होत जाईल, तसतसे त्याचे हे दोन्ही अर्थ उलगडत जातील. सध्या तरी त्यातला राजकीय अर्थ प्रामुख्याने पुढे आलेला आहे.

## ग्रामीण भागातल्या निरक्षरतेचे काय

अजूनही लोकांना असे वाटते की मोदी यांना पुरेसा वेळ दिला पाहिजे. जर लोकांची त्यांना वेळ देण्याची तयारी असेल तर मोदी यांनी राजकीय 'लगीनघाई' करण्याचे कारण नाही. राजकीय पक्ष म्हणून आणि निवडणुकांमधला राजकीय लाभ म्हणून त्यांनी अशा प्रकारचे प्रयत्न करणे जरी स्वाभाविक असले तरीदेखील त्यामध्ये सामान्य जनतेची फरफट होता कामा नये. कारण आतापर्यंत या सगळ्या राजकीय हलवायांनी जनतेच्या घरावर 'तुळशीपत्र' ठेवून आपली 'दुकानदारी' व्यवस्थित चालवली. जनधनयोजनेची घाईगर्दी पाहिल्यानंतर जणूकाही काँग्रेसचीच ही जुनी परंपरा मोदी चालवतील की काय, अशी शंका येते. यापूर्वीच्या राज्यकर्त्यांपेक्षा मोदी हे अधिक वेगाने काम करणारे आणि आक्रमकपणे योजनांची अंमलबजावणी करून देणारे ठरू शकतात. मात्र यासाठी तितक्याच संयमाची गरज आहे. जनधनयोजना ही खरोखरच सामान्य माणसाच्या आणि विशेषत: ग्रामीण भागातल्या निरक्षर माणसाला उपयोगी ठरवायची असेल तर त्याचे अतिशय काटेकोर नियोजन आवश्यक ठरते. ज्या मोबाईल बँकिंगचा उल्लेख मोदी वारंवार करतात, ती प्रणाली वाटते तितकी सोपी नाही. आज ग्रामीण भागातले निरक्षरतेचे प्रमाण आणि अनेक वर्षे ग्रामीण भागात असलेल्या बँकेचा कारभार याची तुलना केली तर परिस्थिती काय आहे, हे सहज लक्षात येईल. आमचे तर म्हणणे असे आहे की, मोदींनी सर्वप्रथम जनतेचे मन काय आहे हे समजून घ्यावे. जनधनऐवजी जनमन योजनेचा पुरस्कार करावा.